**दिनांकः** 05 मार्च, 2014

# आचरणासंदर्भात एकाकीपणा

**-अरुण जेटली**

(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

केंद्र सरकारने जवळपास दोन महिन्याआधी गुजरातमधील कथित"स्नूप गेट" (मुलीचे चौकशी प्रकरण) ची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमण्याचा निर्णय घेतला होता. गुजरात सरकारने आधीच चौकशी आयोग नेमला आहे जे चौकशीचे काम करित आहे. केंद्र सरकारचा उद्देश राजकीय आहे. ती गुजरातची सरकार आणि भाजपाचे पंतप्रधान पदाचे उमेदवार श्री नरेंद्र मोदी यांना अडचणीत आणू पाहत आहे. केंद्र सरकार द्वारे सत्तेचा पूर्णपणे दुरुपयोग करुनही त्यांनी ज्या आयोगाची नेमणूक केली आहे त्यातून बदला घेण्याची द्वेषपूर्ण भावना आणि ईर्षेचा वास येतो. मागील दहा वर्षात अहंकार हा युपिए सरकारचे वैशिष्ट्य बनले आहे. अहंकारामुळे राजकीय पतन सुनिश्चित असते. अहंकारामध्ये नम्रतेचा अभाव असतो. अहंकार त्यांना समाजाच्या विभिन्न वर्गातून वेगळा करतो जे त्यांच्या व्यवहाराला कधीच सहन करु शकत नाहीत.

त्या आयोगाचे काय झाले? आयोगाच्या अध्यक्षतेसाठी एका पाठोपाठ एक अशा सर्वोच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांना आग्रह करण्यात आला. मात्र त्यांनी राजकीय हेतूने प्रेरित असलेल्या या कार्यासाठी आपली सेवा देण्यास इन्कार केला. यानंतर उच्च न्यायालयाच्या काही सेवानिवृत्त न्यायाधीशांना आग्रह करण्यात आला. त्यांनी सुद्धा स्पष्ट केले की यासारख्या कामासाठी ते उपलब्ध नाहीत. सरकार आपल्या आचरणामुळे एकाकी पडली आहे कारण कोणीही त्यांच्या या खोट्या कामात हात घालू शकत नाही.

याचप्रकारे जेव्हा लोकपालाचे चेयरमन आणि त्याच्या सदस्याची निवड करण्यासाठी निवड समिती स्थापन केली गेली, पंतप्रधान आणि जे अन्य लोक निवड समितीच्या संदर्भात त्यांचे विचार वाटत होते त्यांनी कोणतीही प्रसिद्ध नावे उदाहरणार्थ, न्यायमूर्ती वेंकटचैलेया, फली एस नारीमन, सोली जे सोराबजी, के.पारासरन, के.के. वेणुगोपाल आणि हरीश साल्वे यांना निवड समितीत न्यायाधीशांच्या वर्गात सदस्य बनविण्याची स्वीकृती दिली नाही. जेव्हा चौकशी समिती नियुक्त केली तेव्हा सरकारला तीन सरकारी वकिलांमधून एक किंवा अधिक ची नियुक्ती करायची होती आणि त्यांनी त्यांच्या नावाची कल्पना दिली होती. श्रीमती सुषमा स्वराज यांनी यास नकार दिला.

मी 20 जानेवारी 2014 आणि 30 जानेवारी 2014 ला पंतप्रधानांना लिहिलेल्या आपल्या पत्रात त्यांना विनंती केली होती की लोकपाल आणि लोकायुक्त अधिनियमाअंतर्गत बनविण्यात आलेले नियम अधिनियमाच्या विपरित आहेत. यात निवड समिती आणि चौकशी समितीच्या कामकाजाला हडप करण्यात आले आहे. खासकरुन चौकशी समिती फक्त क्लर्की वाले काम करण्यापर्यंत सिमित राहिली आहे. माझ्या हरकतींवर विचार केल्याशिवायच त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. मी युक्तीवाद केला की कार्मिक विभागाने चौकशी समिती आणि निवड समितीचे अधिकार हिरावून घेतले आहेत. निवड समितीच्या कोणत्याही बैठकीत नियुक्तीचे मानदंड ठरवले नाहीत. लोकपालाचे सदस्य आणि अध्यक्षांसाठी प्रसिद्ध व्यक्तिंना आमंत्रित करण्यात आले पाहिजे होते. अर्जांबरोबर समझोता करण्यात आला आणि लॉबिंग करण्यात आली.

श्री फली एस. नारीमन आणि न्यायमूर्ती के.टी. थॉमस यांनी चौकशी समिती चा हिस्सा बनण्यास मनाई केले आहे. त्यांचे म्हणणे होते की जी प्रक्रिया अवलंबिली गेली ती या कार्यासाठी सर्वश्रेष्ठ व्यक्तीच्या निवडीच्या हेतूने नव्हती. आता हे स्पष्ट आहे की लोकपाल सारख्या संस्थेला तिला अस्तित्त्वात येण्याआधीच नष्ट करण्यात आले. जेव्हा प्रतिष्ठित आणि प्रसिद्ध व्यक्ती चौकशी आणि निवड कार्याशी संबंध ठेवण्यास नकार देत आहेत आणि सरकारच्या इराद्यावर शंका व्यक्त करित आहे, तिच्या आचरणासंदर्भात एकाकीपणा सिद्ध झाला आहे.